मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

दैनिक

# रयत समाचार

epaper.rayatsamachar.com

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ३११ वा ● मंगळवार, ता. २० मे २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००





# वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत

## पहिल्याच पावसात पालिकेची झाली पोलखोल

**पाथर्डी । नितिन गटाणी**

दुपारी शहर व तालुक्यात झालेल्या वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत होऊन विजेच्या कडकडाटाने भीतीदायक वातावरण झाल्याने रस्त्यावर वावरणाऱ्या नागरिकांनी सुरक्षित आधार घेतला. सुमारे तासभर मुसळधार पर्जन्यवृष्टी झाली. साईनाथ नगर, फुलेनगर, नाथनगर, आनंदनगर शंकरनगर या सखल भागामध्ये व तळघरातील व्यावसायिकांच्या दुकानांमध्ये पावसाचे पाणी शिरले. उषाताई पतसंस्थेचे अध्यक्ष अमोल बडे यांच्याही घरात पाणी शिरून नुकसान झाले. शहर व परिसरात झालेल्या मुसळधार पावसाने व वादळाने शेकडो झाडे उन्हाळून पडली. यामध्ये खेरडा रस्ता, चांदगाव माळेगाव, तनपुरवाडी, हंडाळवाडी अशा पट्ट्यात झाडे पडण्याचे प्रमाण जास्त होते. विजांच्या गडगडाटाने वीजपुरवठा तात्काळ खंडित झाला. शेवगाव रस्त्यावर वीज वाहकतारांवर झाडा व फांद्याकडून तारा तुटल्याने बराच काळ वीजपुरवठा बंद होता. डांगेवाडी, साकेगाव, माळी बाबुळगाव, हत्राल सैदापूर, तनपुर वाडी अशा पट्ट्यामध्ये वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. साकेगाव परिसरात व शहरात काही ठिकाणी शेतातील सोलर प्लेट वादळामुळे उडून इतरत्र पडल्या. शहरातील दोन्ही नद्यांचा संगम खोलेश्वर मंदिर परिसरात होतो, तेथे नदीला पाणी वाढले. जुन्या बसस्थानकामध्ये तर गुडघाभर पाणी साचून प्रवाशांची मोठी तारांबळ उडाली. पाणी निचरा होणारी यंत्रणा अत्यंत निष्कामी असल्याने पालिकेचेही भांडे फुटले आहे. पहिल्या पावसात शहराची अशी अवस्था झाली आता येणाऱ्या काळात पावसाळ्याचे चार महिने कसे होणार? अशी चिंता शहरवासी यांना लागली. उन्हाळी बाजरी, कांदा, आंबे, भाजीपाला याचे मोठे नुकसान होऊन पावसाचा केंद्रबिंदू शहरापासून दहा-बारा किलोमीटरच्या परिसरातच राहिला. अनेक फ्लेक्सबोर्ड खाली कोसळून पडले. तालुक्यातील निवडून येथे कडूचंद घोडके यांच्या गोठ्यापुढे बांधलेली म्हैस वीज पडून मरण पावली. सायंकाळी साडेसातच्या सुमारास हलक्या स्वरूपाचा पाऊस पुन्हा सुरू झाल्याने तत्पूर्वीच ढगांच्या गडगडात आणि बाजारपेठ पूर्णपणे बंद झाली. वीज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक सायंकाळपर्यंत शहराचा विविध पुरवठा सुरळीत केला. अवकाळी पावसाने यंदा उन्हाळ्यातच ग्रामीण भागामध्ये तलावांमध्ये पाणी साठवून बरेच बंधारे भरले आहेत. मे महिन्यामध्ये पावसाळा सदृश वातावरणाने शेतकरीसुद्धा चक्रावून गेला आहे.

तालुक्यात वादळ वाऱ्याने कोठे नुकसान झाले याची माहिती यंत्रणांकडून घेत आहोत.
**- तहसीलदार डॉ.उद्धव नाईक**

**पालिकेची भूमिगत गटार योजना शहरासाठी चुकीची ठरल्याने पाणी वाहून जाण्यासाठी पुरेशी जागा नसल्याने घरात व दुकानांमध्ये पाणी शिरते. सुधारित नळ योजनेसाठी मुख्य रस्त्यासह गल्लीबोळा ठेकेदाराने खोदून ठेवले. मुसळधार पावसाने मातीचे भरावा होऊन जाऊन शहरातील बहुसंख्य रस्ते चालण्या योग्य राहिले नाहीत त्यामुळे नागरिक संताप व्यक्त करीत आहेत.**

# शंखनाद महोत्सवात हिंदू राष्ट्ररत्न, सनातन धर्मश्री पुरस्कारांचे वितरण



**फोंडा । प्रतिनिधी**

फर्मागुडीमधे आयोजित सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवात हिंदू धर्मजागृती आणि राष्ट्ररक्षणासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. संस्थेचे संस्थापक डॉ. जयंत बाळाजी आठवले यांच्या हस्ते हिंदू राष्ट्ररत्न, तर सनातन धर्मश्री पुरस्कार देऊन २४ जणांना गौरवण्यात आले. कार्यक्रमाला २३ देशांतील २० हजारांहून अधिक साधक आणि हिंदू धर्मप्रेमी उपस्थित होते. मंचावर सनातनचे संस्थापक डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी बिंदा सिंगबाळ, अंजली गाडगीळ यांची उपस्थिती होती. यावेळी उत्तरप्रदेश येथील आचार्य गणेश्वर शास्त्री द्रविड, बांगलादेशामधील बांगलादेश मायनॉरिटी वॉचचे संस्थापक रवींद्र घोष, कर्नाटकमधील पंचशिल्पकार काशीनाथ कवटेकर, मुंबईतील प्रवचनकार डॉ. सच्चिदानंद शेवडे यांना हिंदू राष्ट्ररत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले तर सनातन धर्मश्री पुरस्कार देऊन भाग्यनगर येथील आमदार टी. राजा सिंह, काशी मथुरा येथील सर्वोच्च न्यायालयाचे अधिवक्ता विष्णू जैन, गोव्यामधील योगेश्वर बोरकर, डॉ. देवदत्त पाटील, कर्नाटक येथील प्रमोद मुतालिक, युवा बिग्रेडचे चक्रवर्ती सुलीबेले, दिल्ली येथील गौरव आर्यजी, अहमदनगर जिल्ह्यातील मुळ रहिवासी असलेले दिल्ली येथील डॉ. सुरेश चव्हाणके, उत्तर प्रदेश येथील कॅप्टन प्रवीण चतुर्वेदी, तामिळनाडू येथील अर्जुन संपथ, दिल्ली येथील उदय माहुरकर, कर्नाटकचे माजी अतिरिक्त महाअधिवक्ता अरुण श्यामजी, बेल्जियम येथील लेखक डॉ. कोएनराड एल्स्ट, ओडीसा येथील अनिलकुमार धीर, दिल्लीचे संजीव नेवर, राहुण दिवाण, हरियाणाचे नीरज अत्री, मुंबई येथील डॉ. अमित थडानी, इंडोनेशिया धर्मयशजी महाराज आणि छत्तीसगड येथील प्रबल प्रतापसिंग जुदेव यांचा सन्मान करण्यात आला.

# पार्थ दोषी यांची स्कुल गेम्स फेडरेशन ऑफ इंडीयाच्या मुख्याधिकारीपदी निवड

**श्रीरामपूर । शफीक बागवान**



क्रीडा क्षेत्रात नावलौकीक असलेल्या पार्थ सुरेश दोषी यांची स्कुल गेम्स फ ेडरेशन ऑफ इंडीयाच्या मुख्याधिकारीपदी निवड झाली. भारतीय क्रीडाक्षेत्रात अनेकजण प्रगती करतात. परंतु पार्थ दोषी यांनी ग्रामीण भागात वास्तव्य करीत स्वकर्तृत्वावर क्रीडाक्षेत्रातील प्रवास श्रीरामपूर तालुक्यातील टिळकनगर येथून प्रारंभ झाला. वडील सुरेश दोषी हे टिळकनगर इंडस्ट्रीजमध्ये केमिकल अभियंता होते. तर आई कनक्क्म दोषी या डहाणुकर इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये प्राचार्या होत्या. मध्यमवर्गीय कुटुंब होते. आई-वडीलांचे आशिर्वादाने व मार्गदर्शनाने शाळेपासून बॅडमिंटन, टेबल टेनिस, व्हॉलीबॉल अशा विविध खेळामध्ये त्याची आवड होती. बालवयात व क्रीडा मैदानावर स्वप्न बघायला सुरूवात केली. खेळासाठी मैदान नसेल तर तयार करावयाचे साहित्य उपलब्ध नसेल तर स्वपैशातून साहित्य घेणे ही त्याची जिद्द होती. सुविधा नसतांना कधीही तक्रार केली नाही. फक्त खेळासाठी काहीही करण्याची त्याची तयारी होती. क्रीडाक्षेत्रात व्यवस्थापनाचे शिक्षण पार्थ यांनी घेतले. देशविदेशातील विविध स्तरांवर अनुभव घेत, कोणाच्याही शिफारशीचा आधार न घेता स्वकर्तुत्वावर कष्टाने क्रीडाक्षेत्रात तो लौकीक मिळवत गेला. पार्थ दोषी हा महाराष्ट्र व्हॉलीबॉल संघटनेचे अध्यक्षपदावर सर्वात तरुण व्यक्ती म्हणून काम केले. त्याचे नेतृत्वामुळे संघटनेत नवचैतन्य व पारदर्शकता आली. ग्रामीण खेळाडूंना संधी, उत्तम सुविधा व खुली निवड प्रक्रीया यामुळे महाराष्ट्र व्हॉलीबॉल संघात नवसंजीवनी मिळाली होती. पार्थची स्कुल गेम्स फेडरेशन ऑफ इंडीयाच्या मुख्याधिकारी पदांवर नियुक्ती झाल्याबद्दल त्याचे अभिनंदन होत आहे.

# प्रेस स्वातंत्र्यावर आघात? गुजरात समाचारचे बाहुबली शाह ईडीच्या रडारवर

**अहमदाबाद । प्रतिनिधी**

भारतातील प्रादेशिक माध्यमांची स्वायत्तता आणि पत्रकारितेची अभिव्यक्ती पुन्हा एकदा कठोर प्रश्नांच्या भोवऱ्यात आली आहे. गुजरातमधील अग्रगण्य वृत्तपत्र गुजरात समाचार चे व्यवस्थापकीय संचालक बाहुबली शाह यांना अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात अटक केल्याने देशभरात चिंता व्यक्त होत आहे. ७३ वर्षीय शाह हे हृदयरोगी असून, पूर्वी ब्रेन स्ट्रोकचा झटका आलेला असल्याने त्यांची प्रकृती नाजूक आहे. अटकेनंतर त्यांना अहमदाबादच्या झायडस रुग्णालयात दाखल करण्यात आले. १६ मे रोजी त्यांना जामीन मंजूर झाला असला, तरी त्यांच्या अटकेमागे 'राजकीय सूडभावना' असल्याचा आरोप कुटुंबीय व अनेक माध्यमसमर्थकांकडून करण्यात



येत आहे. पुरातन प्रकरण पुन्हा उघडले : सूत्रांच्या माहितीनुसार, शाह यांच्यावर ईडीने २००६ मधील एका आर्थिक प्रकरणावरून १२ तासांहून अधिक चौकशी केली. मात्र ईडीने या संदर्भात अधिकृत निवेदन दिलेले नाही. त्यामुळे ही कारवाई राजकीय प्रेरित असल्याचा संशय बळावतो. 'गुजरात समाचार'ची ९ दशकांची पत्रकारिता : १९३२ साली स्थापनेपासून 'गुजरात समाचार' हे गुजरातमधील सर्वात मोठ्या प्रसाराचे दैनिक आहे. अहमदाबाद मुख्यालय असलेल्या या संस्थेचा पल्ला केवळ राज्यापुरता मर्यादित नसून मुंबई आणि न्यू यॉर्कपर्यंत पोहोचलेला आहे. जीएसटीव्ही ही २४ तास चालणारी वृत्तवाहिनीही या समूहाचाच भाग आहे. माध्यम स्वातंत्र्य धोक्यात? : प्रसारमाध्यमांवरील अशा स्वरूपाच्या हस्तक्षेपामुळे भारतातील प्रेस स्वातंत्र्याच्या अधःपतनाची प्रक्रिया वेग घेते आहे, असे अनेक माध्यम विश्लेषकांचे मत आहे. रिपोर्टर्स विथआउट बॉर्डर्सच्या अहवालानुसार, भारताचा प्रेस स्वातंत्र्य निर्देशांक गेल्या काही वर्षांत सातत्याने घसरतो आहे. एका प्रतिष्ठित दैनिकाच्या संपादकावर कारवाई केली जाणे ही केवळ एक व्यक्तिविशेषावरील कारवाई नसून संपूर्ण माध्यमविश्वाला दिला गेलेला इशारा मानला पाहिजे. निष्पक्ष चौकशी व न्याय प्रक्रियेचा आदर राखताना प्रेस स्वातंत्र्याचे मूल्यमापन करणे हे लोकशाहीसाठी अनिवार्य आहे.





भारतीय सेनेच्या सन्मानार्थ शहरात तिरंगा यात्रा

भारतीय सेनेने 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे दाखविलेल्या शौर्य, संयम आणि बलिदानाच्या सन्मानार्थ नगर शहरात भव्य तिरंगा यात्रा आयोजित करण्यात आली. तिरंगा यात्रेला समस्त अहिल्यानगरकर उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. हातात तिरंगा घेऊन 'वंदे मातरम्' आणि 'भारत माता की जय'च्या घोषणा देत नागरिक उत्फुर्तपणे सहभागी होत होते, अशी माहिती मयुर बोचुघोळ यांनी दिली.

# सिंदूर पुसणाऱ्या घटनादुरुस्तीचे काय करणार?

१८ जून १९५१ हा दिवस शेतकऱ्यांना पुन्हा गुलामीत ढकलणारा ठरला. त्या दिवशी झालेल्या पहिल्या घटना दुरुस्तीचे जेवढे देशाचे नुकसान केले तेवढे दुसऱ्या कोणत्याच आपत्तीने वा युद्धाने केले नाही. पाच लाख शेतकरी बायांचे सिंदूर ध्वस्त करणारी ही तारीख आहे. त्याबाबत सत्ताधाऱ्यांचे क्रूर मौन आहे!

**शेतकऱ्यांचे योगदान -** १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. हे स्वातंत्र्य मिळवून देण्यात भारतीय शेतकऱ्यांचे मोलाचे योगदान होते. महात्मा गांधी येईपर्यंत झालेल्या एकाही लढ्यात शेतकऱ्यांचा सहभाग नव्हता. अभिजन किंवा सैनिक लढले होते. गांधीजी भारतात आले आणि त्यांनी पहिला सत्याग्रह चंपारण (बिहार) येथे केला. त्या सत्याग्रहात जसे पहिल्यांदा शेतकरी सहभागी झाले, तश्याच स्त्रियाही पहिल्यांदा लढ्यात उतरल्या. शेतकरी आणि स्त्रिया म गांधी यांच्या पाठीशी उभे राहिले म्हणून म गांधी लोकनायक म्हणून ओळखले जाऊ लागले. शेतकरी आणि स्त्रिया हे सर्जक आंदोलनात आल्यामुळे देशाच्या स्वातंत्र्याचा लढा शांततापूर्ण, अहिंसक आणि प्रभावी राहिला. चंपारण पाठोपाठ गुजरात मधील सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वाखालील आंदोलन देखील शेतकऱ्यांचेच होते. या आंदोलनांमुळे भारतीय स्वातंत्र्याचे आंदोलन जनआंदोलन झाले, हा इतिहास अगदी अलीकडचा आहे. परंतु दुर्दैवाने स्वातंत्र्य आंदोलनात शेतकऱ्यांच्या भूमिकेवर फारसा प्रकाश कोणी टाकत नाही.

**सांप्रदायिक आणि दावे -** १५ ऑगस्ट १९४७ चा सूर्य शेतकऱ्यांच्या तळहातावर उगवला होता. या स्वतंत्र देशाची पहिली घटना लिहिली जात होती तेंव्हा पहिल्यांदा खळखळ सुरू झाली. काही लोकांना हा देश एका धर्माचा करायचा होता, त्यांनी डोके वर काढण्याचा प्रयत्न केला, पण तो प्रयत्न नाकाम झाला. तसाच एक प्रयन जमिनीचे राष्ट्रीयकरण करा म्हणणाऱ्यांनी केला. पण तो प्रयत्नही राजाजी (राज गोपालाचारी) सारख्या नेत्यांनी हाणून पाडला. तथाकथित धर्मवादी व डावे या दोघांनी शेतकऱ्यांच्या हितसंबंधाला नख लावायचा प्रयत्न घटना तयार करताना केला होता पण त्यांच्या प्रयत्नाला यश आले नाही. तेंव्हा पासून ही मंडळी डूख धरून आहे.

**मूळ संविधान-** १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झालेल्या देशात २६ जानेवारी १९५० रोजी पाहिले संविधान लागू झाले. त्या पूर्वी या देशात पाचशे हुन अधिक संस्थाने होती. त्यांना घटना नव्हती. मनमाणेल तसा कारभार करायचे! भारताला पाहिले संविधान २६ जानेवारी रोजी मिळाले. या संविधानात शेतकऱ्यांच्या प्रती कोणताही पक्षपात केला गेला नव्हता.



**अमर हबीब**
आंबाजोगाई, महाराष्ट्र
८४११९०९९०९

राष्ट्रसंवाद

भारताच्या मूळ घटनेत खाजगी मालमत्तेचा अधिकार मूलभूत अधिकार म्हणून मानलेला होता (आणीबाणीत तो रद्द मुलभूत अधिकाराच्या यादीतून हटविण्यात आला). अनुच्छेद १३ नुसार मूलभूत अधिकारांचा विरोध किंवा संकोच करता येणार नाही, अशी तजवीज करण्यात आली होती. (हे मूलभूत अधिकारांचे कवच देखील रद्द करण्यात आले) आपल्या मूळ घटनेत फक्त आठ परिशिष्ट होती. अवघ्या दीडच वर्षात पहिली घटना दुरुस्ती करण्यात आली व ९ वे परिशिष्ट जोडण्यात आले. अनुच्छेद ३१ ए व बी मध्ये दुरुस्ती केली की या परिशिष्टात जे कायदे टाकले जातील त्या विरुद्ध टायालयात जाता येणार नाही. या दुरुस्तीमुळे भारतीय शेतकऱ्यांच्या गुलामीची पुन्हा सुरुवात झाली.


**आसुरी आरंभ -** १८ जून १९५० रोजी पहिल्या घटना दुरुस्तीने संविधानात एक नवे परिशिष्ट जोडण्यात आले. व या परिशिष्टात टाकलेल्या कायद्यांच्या विरुद्ध न्यायालयात दाद मागता येणार नाही, भले तो कायदा मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करीत असेल, अशी तजवीज करण्यात आली. आज या परिशिष्टात २८४ कायदे आहेत त्या पैकी २५० कायदे हे शेतकरी किंवा शेतीशी संबंधित आहेत! २८४ पैकी २५० कायदे केवळ शेती व शेतकऱ्यांशी संबंधित असणे हा योगायोग असू शकत नाही. परिशिष्ट ९ हे विषारी सापांचे वारूळ आहे. ते संविधानात टाकल्यामुळे शेतकरीविरोधी कायदे दीर्कु राहिले.

**दुरुस्ती नव्हे बिघाड -** शेतकऱ्यांना न्यायबंदी करणाऱ्या या घटना दुरुस्तीला दुरुस्ती म्हणावी की घटना बिघाड म्हणावे हे तुम्हीच ठरवा. हा प्रकार झाला तेंव्हा हंगामी सरकार होते. तोपर्यंत पहिली निवडणूक झाली नव्हती. प्रौढ मतदानावर आधारित पहिली निवडणूक अवघ्या सहा महिन्याने होणार होती. सहा महिने थांबल्याने आकाश कोसळणारे नव्हते. होय, या हंगामी संसदेला घटना दुरुस्ती करण्याचा कायदेशीर अधिकार होता पण नैतिक अधिकार होता का? अजिबात नाही. त्या काळातील अनेक गांधीवादी व स्वातंत्र्यतावादी नेत्यांनी थांबण्याचा सल्ला दिला होता. तर सांप्रदायिक व डाव्या पक्षांनी घटनादुरुस्तीचे समर्थन केले होते.

**एक चूक घोडचूक -** १८ जून १९५१ रोजी पहिला घटनाबिघाड झाला नसता तर १) कमाल शेतजमीन धारणा कायदा २) आवश्यक वस्तू कायदा ३) जमीन अधिग्रहण कायदा हे संविधानविरोधी, मूलभूत हक्कांचा संकोच करणारे कायदे इतकी वर्षे टिकलेच नसते. सीलिंग कायदा तर न्यायालयाने तेंव्हाच बेकायदा ठरवला होता, नंतर तो परिशिष्ट ९ मध्ये टाकला गेला. जमीन अधिग्रहणाबाबत ही तेच आहे. हे कायदे नसते तर शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची पाळीच आली नसती. ज्या देशात पाच लाख शेतकरी कुटुंबातील बहिनींचे सिंदूर पुसले गेले पण ज्या देशातील सरकारला त्याची तमा नाही, अशा देशात आपण राहतो. शेतकऱ्यांबाबत हा पक्ष चांगला किंवा तो पक्ष वाईट असे म्हणता येत नाही! सगळेच सारखे, सगळेच शेतकऱ्यांचे मारेकरी! काँग्रेस असो की भाजप दोघांचे हात शेतकऱ्यांच्या रक्ताने लाल झाले आहेत. अशा परिस्थितीत आपण काय करू शकतो? मी ठरवले की, शेतकरीविरोधी कायदे रद्द करा, परिशिष्ट-९ रद्द करा, या मागणीचे निवेदन प्रधानमंत्री यांना पाठवायचे, १८ जूनला काळी फीत लावायची. जेथे शेतकरी परतंत्र दिवसाचा कार्यक्रम होईल तेथे सहभागी व्हायचे! एक सामान्य नागरिक, एक किसानपुत्र आजच्या परिस्थितीत दुसरे काय करू शकतो?

# शहरासह उपनगरात पावसाची जोरदार बॅटिंग; नागरिकांचे नुकसान





**अहमदनगर । तुषार सोनवणे**

शहरासह बोल्हेगाव व सावेडी उपनगरात सोमवारी दुपारी ३ वाजेच्या सुमारास पावसाने विजेच्या कडकडाटासह जोरदार हजेरी लावली. सुमारे २५ ते ३० मिनिटं झालेल्या या पावसाला वादळी वाऱ्याची साथ होती, ज्यामुळे अनेक भागांत नागरीकांचे मोठे नुकसान झाले. अचानक आलेल्या वादळी पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. काही भागांमध्ये घरात पाणी शिरल्याने संसारोपयोगी वस्तूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. विशेषतः ड्रेनेजची झाकणं उघडी असतानाही पाण्याचा जोर एवढा होता की पाणी थेट घरात घुसले. तर बोल्हेगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा मैदान या खेळाच्या मैदानाला तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले होते. झालेल्या नुकसानीमुळे महापालिकेने लाखो रुपये खर्चून बांधलेल्या ड्रेनेजलाईनच्या कामावर प्रश्न नागरिकांनी प्रश्न उपस्थित करत नाराजी व्यक्त केली.

## उच्चशिक्षित प्राथमिक शिक्षक पदोन्नतीसाठी राज्य कृती समितीचे मुख्यमंत्र्यांना साकडे

**अहमदनगर । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नियोजित राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीसाठी आले असता महाराष्ट्र राज्य उच्चशिक्षित एम एड प्राथमिक शिक्षक कृती समितीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देऊन महाराष्ट्र राज्यातील उच्चशिक्षित प्राथमिक शिक्षकांना केंद्रप्रमुख व विस्ताराधिकारी तथा त्या पुढील उच्च पदस्थापनेसाठी शालेय शिक्षण विभागातील संबंधित खात्यांना मसुदा तयार करणेकामी कार्यवाही करण्याचे निर्देशित करावे, अशा प्रकारची विनंती केल्याची माहिति महाराष्ट्र राज्य उच्चशिक्षित कृती समितीचे राज्यउपाध्यक्ष राजेंद्र निमसे यांनी दिली.



महाराष्ट्र राज्य उच्चशिक्षित एम एड कृती समितीची स्थापना झाल्यापासून गेले तीन वर्ष समितीच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्यात जिल्हा परिषदेमध्ये कार्यरत असणाऱ्या प्राथमिक शिक्षकांमधून उच्च शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या शिक्षकांना रिक्त असलेल्या अनेक पदावर त्यांच्या अनुभवाच्या उच्चशिक्षित असल्याचा फायदा मिळणे कामी व शैक्षणिक गुणवत्ता विकासाचे विविध उपक्रम राबविणे कमी आरटीआय २०१९ अंतर्गत व नवीन शैक्षणिक धोरण २०२० अन्वये राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाच्या संदर्भात योग्य अंमलबजावणी करणे कामी उच्चशिक्षण संधी दिली असता वेळोवेळी राबविण्यात येणारे उपक्रमांची कार्यवाही यशस्वी होऊ शकते ,असे वारंवार संबंधित खात्याच्या मंत्र्यांना अथवा अनेक लोकप्रतिनिधी आमदार ,संबंधित विधान परिषद मधील शिक्षक आमदार यांना निवेदनाद्वारे प्रत्यक्ष भेटून सांगितलेली व विनंती केलेली आहे . गेल्या तीन वर्षापासून राज्यातील उच्च शिक्षित एम एड कृती समितीने केंद्रप्रमुखांच्या संदर्भातील ४०-३०-३० % चा शासन निर्णय रद्द करून ५०- ५०% टक्के प्राथमिक शिक्षकांमधून केंद्रप्रमुख नेमण्यासंदर्भात पाठपुरावा केला तसेच त्यामध्ये असलेले वयाची व गुणांची अट रद्द करण्यासंदर्भात सुद्धा वेळोवेळी पाठपुरावा यशस्वी केला आहे. पदवीधर शिक्षकांमधून केंद्रप्रमुख पदी पदोन्नती होणे कामी सातत्याने यशस्वी पाठपुरावा केला गेला. यापुढेही प्राथमिक शिक्षक पदवीधर शिक्षक यामधील उच्चशिक्षित व अनुभवी प्राथमिक शिक्षकांना उच्चपदस्थ सेवेच्या संधी काही प्रमाणात राखीव ठेवल्या जाव्यात अशा प्रकारचा प्रयत्न होणार असल्याचे राज्याध्यक्ष राजू जाधव, राज्यकोषाध्यक्ष तेजराव देशमुख यांनी सांगितले. लवकरच राज्यभरात बदल्यांची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शासन स्तरावर योग्य प्रमाणात पाठपुरावा करण्याचे उच्चशिक्षित एम ए कृती समिती समिती राज्य कार्यकारिणीने जाहीर केले. संबंधित पाठपुरावा शासनाकडून पूर्तता झाली नाही तर कायदेशीर बाबीचा सुद्धा निर्णय विचाराधीन असून न्यायालयीन लढाई लढण्याचा विचार असल्याचे महिला प्रमुख नसरीन बानो सय्यद,पूजा धुरी,सुजाता मुन, राज्य प्रसिद्धी प्रमुख सूर्यकांत दडस यांनी स्पष्ट केले.

## लोहार समाजातील गुणवंतांचा रविवारी सत्कार

### निबंध स्पर्धेचेही पारितोषिक वितरण

**अहमदनगर । प्रतिनिधी**

अखिलमहाराष्ट्रगाडीलोहार समाज विकास महासंघ प्रणित लोहार शिक्षण परिषदेच्या वतीने समाजातील गुणवंत विद्यार्थी गुणगौरव व पदोन्नती मिळालेले समाजाचे अधिकारी तसेच पुरस्कारप्राप्त उद्योजक यांचा सत्कार व लोहार शिक्षण परिषदेने आयोजित केलेल्या निबंधलेखन स्पर्धेत पारितोषिक वितरण समारंभ रविवारी, २५ मे रोजी सकाळी १०.३० वाजता हॉटेल द व्हाईटहाऊस कोहिनूर मॉल शेजारी येथे आयोजित केला आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पुण्याच्या अतिरिक्त जिल्हाधिकारी ज्योती कावरे, महासंघाचे अध्यक्ष सदाशिवराव हिवलेकर, महासंघाचे सचिव प्रा.डॉ. एस.के. पोपळघट, शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे उपस्थित राहणार आहेत.

जिल्ह्यातील १०वी १२वी बोर्ड परीक्षेतील, स्कॉलरशिप व इतर परीक्षेतील गुणवत्ता प्राप्त गुणवंत विद्यार्थ्यांचा भेटवस्तू व प्रमाणपत्र देऊन गुणगौरव व निबंध स्पर्धेतील विजेत्यांचा पारितोषिक देऊन सत्कार करण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी लोहार शिक्षण परिषदेचे राज्याध्यक्ष प्राचार्य सुभाष कौसे, सामाजिक कार्यकर्ते व लोहार शिक्षण परिषदेचे उपसचिव प्रा. हर्षल आगळे - ९८२२३३५५९२ यांच्याशी संपर्क साधावा.

## कै. छबु पैलवान लांडगे स्मरणार्थ चांदीची गदा सुपूर्द

### देवाभाऊ जिल्हा केसरी कुस्ती स्पर्धेची तयारी अंतिम टप्प्यात



**अहमदनगर । प्रतिनिधी**

शेवगावमध्ये होणाऱ्या देवाभाऊ जिल्हा केसरी कुस्ती स्पर्धा २०२५ साठी विजेत्या मल्लास देण्यात येणारी मानाची चांदीची गदा कै. छबु पैलवान लांडगे यांच्या स्मरणार्थ अहिल्यानगर जिल्हा तालीम संघाच्या वतीने देण्यात आली. ही स्पर्धा अहिल्यानगर जिल्हा तालीम संघ, शेवगाव तालुका तालीम संघ आणि वंदे मातरम क्रीडा व सांस्कृतिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने २८ व २९ मे रोजी खंडोबानगर, शेवगाव येथील मैदानावर होणार आहे. या स्पर्धेच्या तयारीचा अंतिम टप्प्यात असून, सोमवारी (दि.१९ मे) चांदीची गदा भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सरचिटणीस व स्पर्धेचे आयोजक अरुण मुंढे यांच्याकडे जिल्हा तालिम संघाचे नगर शहराध्यक्ष पै. नामदेव लंगोटे व पै. श्यामभाऊ लोंढे यांच्या हस्ते सुपूर्त करण्यात आली. यावेळी गदेचे पूजनही करण्यात आले. यावेळी चांदीच्या गदेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी अरुण पाटील लांडे, विजयराव देशमुख, फुलचंद अण्णा रोकडे, जिल्हा तालिम संघाचे अध्यक्ष पै. वैभव लांडगे, खजिनदार पै. नाना डोंगरे, किरण कोतकर, नंदू मुंडे, बाळासाहेब कोळगे, विलास फाटके, कडू मगर, बाळासाहेब डोके, सालारभाई शेख, भाऊ वाघमारे, अजिनाथ मासाळकर, कानिफ साखरे, अनिकेत ढाकणे, नगरसेवक अंकुश कुसळकर, अजय भापकर, कमलेश गांधी, बाळासाहेब खटोड, सरपंच पप्पू केदार, राजू तिवारी, जयकिसान बलदवा, उदय मुंडे, विनायक खेडकर, मच्छू कोरडे, एकनाथ कुसळकर, अमोल सागडे, राम कोळगे, सोमनाथ मोहिते, नाना देहडराव, रमेश जाधव, अभय पालवे, बाळासाहेब नजन, गोपी तिवारी, अमोल भोकरे, सोमनाथ लोखंडे, पै. छगन पानसरे, वाकडे सर आदी उपस्थित होते. अरुण मुंढे यांनी यावेळी सांगितले की, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर भव्य डोंब उभारण्यात येणार असून, मैदानाची तयारी, स्टेज, प्रेक्षक गॅलरी आदी कामे सुरू आहेत. यावेळी महाराष्ट्र केसरी मल्ल एकमेकांना भिडणार असून, विजेत्या मल्लासाठी भरीव बक्षीस ठेवण्यात आले आहे. मल्लांसाठी राहण्याची, जेवणाची उत्तम व्यवस्था करण्यात आली असून, संपूर्ण जिल्ह्यातील मल्लांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. स्पर्धेच्या ठिकाणी आयोजक व तालीम संघाचे पदाधिकाऱ्यांनी पाहणी करून मांडव, प्रेक्षक गॅलरी, कुस्ती मैदान उभारणीबाबत सूचना केल्या. या स्पर्धेच्या नियोजनासाठी मोहन हिरणवाळे, सुनील भिंगारे, प्रताप चिंधे, विलास चव्हाण, पप्पू शिरसाठ, सुनील भिंगारे, ऋषिकेश धांडे, संदीप बारगुजे, बबलू धुमाळ, भागवत ठोंबरे, नाना कोतकर, विशाल नाकाडे, अनिल ढवण प्रयत्नशील आहेत. संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष या भव्य कुस्ती स्पर्धेकडे लागले आहे.

## आपली नऊवारी' कार्यशाळा

### सात दिवस, सात नऊवारी!

**अहमदनगर । प्रतिनिधी**

नऊवारी साडी म्हणजे केवळ वस्त्र नाही, तर महाराष्ट्राच्या परंपरेचा, सौंदर्याचा आणि अस्मितेचा एक अनमोल वारसा आहे. याच पारंपरिक नऊवारीला आधुनिक फिनिश देत महिलांना स्वरोजगाराच्या संधी देण्यासाठी नगरमध्ये एक विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. ISDT (Institute for Studies in Design & Technolog) या संस्थेतर्फे ३० मे २०२५ ते ७ जून २०२५ दरम्यान 'सात दिवस सात नऊवारी' ही प्रशिक्षण कार्यशाळा भरवण्यात येत आहे. या कालावधीत सहभागी महिलांना दररोज तीन तासांचे तांत्रिक प्रशिक्षण देण्यात येणार असून, सात दिवसात सात प्रकारच्या नऊवारी साड्यांचे शिवणकौशल्य आत्मसात करण्याची संधी मिळणार आहे. प्रवेश शुल्क केवळ ५,००० रुपये असून, नावनोंदणीची अंतिम तारीख २५ मे २०२५ आहे. नावनोंदणीसाठी खालील ऑनलाइन लिंक उपलब्ध आहे: https://forms.gle/DrzTvuFejyMzSYdB7 कार्यशाळेचे ठिकाण: ६९९९, कॅड पॉइंटच्या मागे, होम केअर लॅब समोर, लालटाकी, अहिल्यानगर ४१४००१ Google Map/ bH$https://g.co/kgs/Dqe24Kb ही कार्यशाळा संस्थेच्या २१ वर्षांच्या यशस्वी प्रवासाचा भाग असून, गृहिणी, विद्यार्थीनी तसेच उद्योजक महिलांसाठी ही सुवर्णसंधी ठरणार आहे. नऊवारीमध्ये नवीन डिझाईन्स, कलाकुसर व सिलाईचे तंत्र शिकण्यास उत्सुक असलेल्या महिलांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आयोजकांनी आवाहन केले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क: ७७२००२९०८८

## मनपा कामगार प्रलंबित प्रश्नांबाबत बेमुदत धरणे आंदोलनाचा इशारा

**अहमदनगर । प्रतिनिधी**

महापालिकेतील कामगार-कर्मचाऱ्यांचे अनेक महत्त्वाचे प्रश्न गेल्या कित्येक वर्षांपासून प्रलंबित असून, वेळोवेळी निवेदन, पत्रव्यवहार आणि चर्चेनंतरही प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यामुळे कामगार संघटनेकडून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. २८ मे २०२५ पर्यंत मागण्या मान्य न झाल्यास बेमुदत धरणे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सरसर यांनी दिला आहे. कामगार संघटनेच्या म्हणण्यानुसार, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ५०६ कोर्ट कर्मचाऱ्यांना ५ व्या वेतन आयोगाचा फरक २४ समान हप्त्यांमध्ये देण्याचा निर्णय झाला असून, केवळ एक हप्ता दिवाळीपूर्वी अदा करण्यात आला आहे. उर्वरित हप्ते अद्याप देण्यात आलेले नाहीत. याशिवाय, हद्दवाढीतील कामगारांचे फरकाचे तक्ते अद्याप तयार झालेले नाहीत. ६ व्या वेतन आयोगाचे दोन हप्ते कामगारांना मिळालेले नाहीत. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनाही फरकाची रक्कम दिलेली नाही. कालबद्ध पदोन्नतीच्या फरकाची रक्कम गेल्या ८-१० वर्षांपासून थांबलेली आहे. वैद्यकीय प्रतिपूर्तीची बिले तात्काळ अदा करणे व ती भविष्यात दरमहा पगारासोबत देणे, निवृत्ती वेतन अंशदान योजनेतील २५० लाभार्थ्यांची रक्कम त्यांच्या खात्यात वर्ग करणे, आणि भविष्य निर्वाह निधीची रक्कम वेळेवर जमा करणे, या मागण्या रखडलेल्या असून, एल.जी.एस.-एल.एस.जी.डी. परीक्षा उत्तीर्ण कर्मचाऱ्यांना जादा वेतनवाढ देण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवण्यात यावा, तसेच निवड समिती गठित करून पात्र कर्मचाऱ्यांना बढती आणि कालबद्ध पदोन्नती देण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. आरोग्य विभागातील व कर्मचाऱ्यांना वार्षिक वेतनवाढ देणे, तसेच महासभेच्या ठरावानुसार कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करण्याचा प्रस्ताव शासनाकडे तात्काळ मंजुरीसाठी पाठवावा, अशीही मागणी कामगार युनियनच्या वतीने महापालिका आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



**महापालिकेतील कर्मचाऱ्यांसाठी घरकुल योजना राबवावी, आणि परिचारिकांना शासकीय नियमानुसार वेतनश्रेणी लागू करावी, अशीही ठाम भूमिका संघटनेने मांडली आहे. आम्ही आंदोलन करणे टाळू इच्छितो, पण प्रश्नांची सोडवणूक न झाल्यास बेमुदत धरणे आंदोलन अपरिहार्य ठरेल, असा स्पष्ट इशारा कामगार संघटनेचे आनंद वायकर यांनी दिला आहे.**

रयत समाचार **Classified** छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल

आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

**भाड्याने देणे**

परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.

**- संपर्क -**

८८८८३४७४११

निसार Art

सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट

7020356335 | 9860830016

पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.



मे. रुपाली एजन्सी

फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स

राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.

(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०

ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!

कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द

जगदंबा टी सेंटर

चहा, कॉफी, लेमन टी

शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर

शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर

प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे

97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com** , **उपसंपादक :** दिपक शिरसाठ, 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# श्रीराम तरुण मंडळाकडून हज यात्रेकरूंना निरोप

## शहरातील सलोखा कायम राहण्यासाठी प्रार्थना करण्याचे आवाहन

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

श्रीरामपूर शहर हे सर्व जातीधर्माच्या लोकांनी मिळून वसवलेले आहे. या शहराच्या ज्या परंपरा जुन्या जाणत्या लोकांनी निर्माण केल्या,त्या जतन करण्याचे काम श्रीराम तरुण मंडळ गेली अनेक वर्ष करीत आहे. याचाच एक भाग म्हणून यावर्षी देखील शहरातील जे मुस्लिम बांधव हज यात्रेसाठी जात आहेत त्यांना निरोप देण्याचा समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. श्रीराम मंदिर चौकात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेतकरी नेते अहमदभाई जहागीरदार होते. यावेळी पत्रकार अनिल पांडे, माजी नगरसेवक नितीन पिपाडा, मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष गौतम उपाध्ये, बुरहान भाई जमादार, संजय यादव, अ‍ॅड.आदेश दुशिंग आदींची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी बोलताना श्रीराम तरुण मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अशोक उपाध्ये यांनी सांगितले, श्रीरामपूर शहरातील रामनवमी व उरूस एकत्र साजरा करण्याचा निर्णय शहराचे प्रथम नगराध्यक्ष रामचंद्र महाराज उपाध्ये यांच्या मार्गदर्शनाखाली तत्कालीन शहरातील प्रमुख लोकांनी घेतला आणि शहरांमध्ये सर्वधर्मीय सलोखा राहावा असे प्रयत्न आतापर्यंत सर्वांनीच केलेले आहे. तीच परंपरा पुढे राखत श्रीराम तरुण मंडळ



( छाया - दिपक कदम )

सर्वधर्मीयांना सोबत घेऊन काम करीत आहे. त्याचाच एक भाग म्हणून आज याठिकाणी यावर्षी हजयात्रेला जाणारे श्रीराम तरुण मंडळाचे मार्गदर्शक, ज्येष्ठ पत्रकार सलीमखान पठाण व इतर सर्व सहकारी यांचा सत्काराचा व निरोपाचा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. हजयात्रेला जाणाऱ्या सर्व भाविकांनी शहराच्या सलोख्यासाठी मक्का आणि मदिना येथे अल्लाहच्या दरबारात विशेष प्रार्थना करावी, अशी विनंती त्यांनी केली. यावेळी बोलताना ज्येष्ठ पत्रकार सलीमखान पठाण यांनी श्रीराम तरुण मंडळ हे सर्वांना सोबत घेऊन शहरांमध्ये काम करीत आहे. शहराचा धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक सलोखा राखण्याचे काम अशोक उपाध्ये व त्यांचे सर्व सहकारी करीत असतात. आजचा उपक्रम हा त्याचाच एक भाग आहे असे सांगून शहरातील सर्व धर्मीयांचा एकोपा वाढवणारा हा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल सर्व हज यात्रेकरुंच्या वतीने त्यांनी मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांना धन्यवाद दिले. अध्यक्षीय भाषणात अहमदभाई जहागीरदार यांनी शहराचे वातावरण अलीकडच्या काळात बदलत असले तरी सलोखा आणि एकता यासाठी धडपडणाऱ्यांची संख्या जास्त असल्याने श्रीरामपूरमध्ये सर्वांचा सलोखा कायम राहील अशी अपेक्षा व्यक्त करून हज यात्रेनंतर परत येणाऱ्यांनी सर्व संकेत पाळून जीवन जगावे असे आवाहन केले. पत्रकार अनिल पांडे यांनी देखील यावेळी शुभेच्छा दिल्या. यावेळी हजयात्रेस जाणारे ज्येष्ठ पत्रकार सलीमखान पठाण, मतीन शेख हैदराबादवाले, माजी मुख्याध्यापक फारूक शाह, बेगु पटेल सर, माजी नगरसेवक सलीम शेख, फिरोज तांबोळी, रियाज अब्दुल पठाण, अंजर युसूफ पठाण, रफिक अल्लारखा मेमन, सोहेल मुसानी आदींचा मान्यवरांच्या हस्ते हाजी रुमाल व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मंडळाचे पदाधिकार राजू सोनवणे, गौतम उपाध्ये, राजेंद्र उंडे, आयाज तांबोळी, राजेंद्र लचके, सोमनाथ चापानेरकर, रमाकांत पाथरकर, राजेंद्र पाटणी, सतीश शहाणे, जयराम उपाध्ये, विलास कुऱ्हे, अमोल भस्मे, शशिकांत कडुस्कर सर, प्रशासनाधिकारी ज्ञानेश्वर पटारे, रविंद्र कांबळे, नाजीम शेख, अमन मंसूरी, जाफरखान, अशोक गवारे, संजय यादव, मंजूर मलिक, अर्षद मलिक, मुस्ताक तांबोळी, दीपक कदम, जयश सावंत, सय्यद जाकीर सर, इजाज पठाण, जाफरखान आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन अशोक उपाध्ये यांनी केले तर आभार मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र उंडे यांनी मानले.

# कोपरगाव तालुक्यातील पाणीटंचाईग्रस्त गावांना दिलासा

**कोपरगाव । किसन पवार**

कोपरगाव तालुक्याच्या पूर्व भागातील दुष्काळी परिस्थितीमुळे अनेक गावांमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली होती. आपेगाव, गोधेगाव, घोयेगाव, धोत्रे, तळेगाव मळे या गावांतील विहिरी आटल्यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. या गंभीर परिस्थितीची दखल घेत मा.आ. स्नेहलता कोल्हे यांनी तातडीने पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून गोदावरी डाव्या कालव्याच्या लाभक्षेत्रातील कोळ नदीवरील घोयेगाव-गोधेगाव साठवण बंधारा भरून घेण्यासाठी विशेष



पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे संबंधित साठवण बंधाऱ्यात गोदावरी डाव्या कालव्यातून पाणी सोडण्यात आले आहे.

या उपक्रमामुळे आपेगाव, गोधेगाव, घोयेगाव, धोत्रे, तळेगाव मळे या गावांमध्ये पाणीपुरवठा योजनांना चालना मिळाली असून, पिण्याच्या पाण्याचा बिकट प्रश्न सुटला आहे. पिण्याच्या पाण्यासाठी होणारी धावपळ थांबली असून ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. या कार्याबद्दल संबंधित गावांच्या ग्रामपंचायती व नागरिकांनी कोल्हे यांचे आभार मानले असून, त्यांच्या तत्पर व लोकहितवादी कार्याचे कौतुक केले.

# श्रीरामपूर न्यायालयात फडणवीसांसह अनेकांवर गुन्हे दाखल

**श्रीरामपुर । शफीक बागवान**

महाविकास आघाडी सरकारने विधानसभा निवडणुकीत शेतकऱ्यां घना सातबारा कोरा करण्याचे आश्वासन देऊनही ते पाळले नाही याबाबत शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अजित काळे यांनी श्रीरामपूर पोलीस स्टेशन मध्ये प्रत्यक्ष पोलीस निरीक्षक यांना आरोपी देवेंद्र फडणवीस, अजित पवार, एकनाथ शिंदे व माणिक कोकाटे यांचे विरुद्ध फिर्यादी युवराज भाऊसाहेब जगताप यांच्या नावे भारतीय न्यायदंड संहिता २०१३ मधील कलम १७१, ३१६ (दोन), ३१८ (चार) व तीन (पाच) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हा नोंदवून एक महिना झाला तरीही पोलीस प्रशासनाने आरोपी विरुद्ध कुठलीही कारवाई केली नाही अथवा चौकशी केली नाही त्यामुळे श्रीरामपूर तालुका शेतकरी संघटनेच्या माध्यमातून श्रीरामपूर येथील कनिष्ठ स्तर न्यायालयात अखेर दाद मागितली आहे. शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अ‍ॅड. अजित काळे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीरामपूर येथील न्यायालयात अ‍ॅड. प्रशांत कापसे अ‍ॅड. सर्जेराव घोडे अ‍ॅड. ऋतुजा कापसे अ‍ॅड. किशोर धनवटे काम पाहत आहेत. श्रीरामपूर येथील जुनियर डिव्हिजन कोर्ट मध्ये केस नंबर ९०१/ २०२५ असून याबाबत पहिली सुनावणी झाली आहे. न्यायालय संबंधित आरोपींना म्हणणे मांडण्यासाठी काय नोटीस काढतात याकडे फिर्यादीचे लक्ष लागले आहे. फिर्याद दाखल करतेवेळी अ‍ॅड. अजित काळे, जिल्हाध्यक्ष अनिल औताडे, सुदामराव औताडे, साहेबराव चोरमल, संतोष पटारे, बबनराव उघडे, सुजित बोडके, अ‍ॅड. बाळासाहेब बकाल, अ‍ॅड. प्रशांत कापसे, एडवोकेट सर्जेराव घोडे, अ‍ॅड. रावसाहेब मोहन, सोपान नाईक, सागर गिऱ्हे, बाबासाहेब वेताळ आदि शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी अ‍ॅड. अजित काळे म्हणाले की आपण हा लढा शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणे पर्यंत लढणार आहोत. तालुकास्तरावरून जिल्हास्तरावरून उच्च न्यायालय सर्वोच्च न्यायालयापर्यंत राज्यातील शेतकऱ्यांसाठी न्याय मागणार आहोत. तसेच राज्यात विविध शेतकरी संघटनेच्या माध्यमातून अशा प्रकारच्या केसेस करण्याचे आंदोलन राज्यभर चालविणार आहोत असेही अ‍ॅड. अजित काळे म्हणाले.

# १९ ते २३ मे दरम्यान पावसाचा हवामान खात्याचा अंदाज

## नागरिकांनी सतर्कता बाळगण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**अहमदनगर । प्रतिनिधी**

जिल्ह्याच्या काही भागात १९ ते २१ मे २०२५ या कालावधीत गडागडाटासह वादळी वारा, वीज पडणे तसेच अतिवृष्टी होण्याची शक्यता असून जिल्ह्यासाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच २२ मे २०२५ रोजी वीजांच्या कडकडाटांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस आणि तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता असून २३ मे रोजी मुसळधार पाऊस पडण्याची हवामान खात्याने शक्यता वर्तवली आहे. जिल्ह्यासाठी पिवळा इशारा (यलो अलर्ट) जारी करण्यात आलेला आहे. नागरिकांनी आवश्यक ती दक्षता घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे. मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा. ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल/ सायकल यांचेपासून दूर रहावे. मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत / दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विद्युतवाहिनी अथवा ट्रान्सफॉर्मरजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अधांतरी लटकणाऱ्या किंवा लोंबकळणाऱ्या केबल्स पासून दूर रहावे. जाहिरात फलक (होर्डिंग्ज) कोसळून होणाऱ्या दूर्घटना टाळण्यासाठी दक्षतेची बाब म्हणून जाहिरात फलकांच्या (होर्डिंग्ज) आजूबाजूला थांबू नये व योग्य ती दक्षता घ्यावी. वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे. जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा. धरण व नदीक्षेत्रामध्ये पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी. धरणाचे पाण्यात वा नदीच्या पाण्याच्या प्रवाहामध्ये उतरू नये. धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. वादळी वारा, पाऊस व गारपीट यामुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे. शेतकऱ्यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल, तर सदर मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी.जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे.

# २१ मे रोजी शेवगांव येथे भव्य तिरंगा पदयात्रा

**शेवगांव । लक्ष्मण मडके**

ऑपरेशन सिंदूरच्या यशस्वी कारवाईच्या अनुषंगाने भारतीय लष्कराच्या समर्थनार्थ सर्व राष्ट्रप्रेमी नागरीकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने बुधवार ता. २१ मे २०२५ रोजी शेवगांव येथे भव्य तिरंगा पदयात्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या तिरंगा पदयात्रेची सुरुवात सकाळी ८ वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून होणार आहे. पहलगाम येथील भारतीय पर्यटकांवर दहशतवादी हल्ला होवून त्यात २७ निष्पाप पर्यटक मारले गेले, या कृत्यामुळे संपूर्ण भारतात पाकिस्तान व आंतकवादी कृत्यांच्या विरोधात तीव्र संतापाची लाट होती. या कृत्याचा बदला म्हणून भारतीय नेतृत्व व लष्कराने ऑपरेशन सिंदूर यशस्वी राबवून पाकिस्तानातील दहशतवादी तळाचा नायनाट करुन, पाकिस्तानच्या संरक्षण दृष्टया महत्वाच्या ठिकाणी हल्ले करुन त्यांचे मोठे नुकसान केले. भारतीय संरक्षण दलाच्या या गौरवपूर्ण कामगिरीच्या सन्मानार्थ संपूर्ण भारतभर भव्य तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात येत आहे. ऑपरेशन सिंदूर या लष्करी मोहिमेत भारतीय लष्कराने आपल्या सामरिक क्षमतेचे दर्शन घडवित भारत देश दहशतवादा विरूध्द किती आक्रमक भूमिका देऊ शकतो असे जगाला दाखवून दिले. एक भारतीय म्हणुन या तिरंगा पदयात्रेत सहभागी होऊन एकतेचे दर्शन घडवूया आणि सीमेवरील सैनिकांचे मनोबल वाढवूया असे आवाहन आयोजकांकडून नागरिकांना करण्यात आले आहे. या तिरंगा पदयात्रेत सर्व राष्ट्रप्रेमी, सामाजिक संस्था, समविचार संस्था, व महिला सहभागी होणार आहेत. या तिरंगा पदयात्रेच्या वेळी शहीद जवान स्मारक, किंवा हुतात्मा स्मारक यांना श्रध्दाजली अर्पण करुन, देश भक्तीच्या घोषणा, देश भक्तीपर गीते लावून, हम सेना के साथ है, ऑपरेशन सिंदूर के साथ राष्ट्र, असे बॅनर लावून आपल्या वीर जवानांना अभिवादन करण्यात येणार आहे. या तिरंगा पदयात्रेत सर्व राष्ट्रप्रेमी, नागरीक, युवक-युवती यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले.

# साई संस्थान सुरक्षा रक्षकाचे विषप्राशन ; परिस्थितीत चिंताजनक

**शिर्डी । शफीक बागवान**

गेल्या सहा दिवसापूर्वी साई संस्थानचे सुरक्षा रक्षक संदिप वाणी यांनी विषप्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला असून तो मृत्युशी झूंज देत आहे .

संदिप साहेबराव वाणी नांदुर्खी ता राहाता हा एमएसएफ या सुरक्षा एजन्सी चा सुरक्षा रक्षक असून तो २०० रुम साईनाथ हॉस्पिटल येथे ड्युटीस होता . पाच दिवसांपुर्वी तो नांदुर्खी येथे विष प्राशन केलेल्या अवस्थेत आढळून आला असता त्याचे नातेवाईकांनी व भावाने त्यास गंभीर अवस्थेत साईबाबा सुपर हॉस्पीटल मध्ये अँडमीट केले . ॲडमीट करते वेळी पेशंट डेंजर झोनमध्ये गेल्याने तेथील डॉक्टरांनी शतीर्च प्रयत्न केले . शिर्डी पोलीसांनी त्याचा जबाब घेण्याचा प्रयत्न केला परंतु त्याची परिस्थिती गंभीर असल्याने जबाब नोंदवता आला नाही .

आता सध्या तो अतिदक्षता विभागात उपचार घेत असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे तेथील डॉक्टरांनी सांगितले .

दरम्यान वाणी यांनी विष प्राशन का केले ? वरिष्ठांच्या की सहकाऱ्यांच्या त्रासाला कंटाळून वाणी यांनी विष प्राशन केले की अन्य काही कारण आहे हे अद्याप समजू शकले नाही.



# श्रीसंत वामनभाऊ विद्यालयात यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

मार्च २०२५ मध्ये झालेल्या एस.एस.सी.बोर्ड परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. त्यामध्ये तालुक्यातील श्री संत वामनभाऊ विद्यालय वडुले खुर्द मधील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. विद्यालयाचा एकूण निकाल ८६.८४% लागला आहे निकालाची विद्यालयाची यशाची परंपरा विद्यालयाने कायम ठेवली आहे कु. अनुष्का गणेश भालसिंग हिने ८२ टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक मिळवला तर कु. आव्हाड साक्षी शिवनाथ हिने ७९.८०% गुण मिळवून द्वितीय क्रमांक तर बडे आदेश पांडुरंग याने ७६.२०% गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला.

विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल विद्यालयाच्या वतीने १९ मे रोजी (सोमवार) पहिले पाच यशस्वी विद्यार्थी व पालकांचा विद्यालयाचे मुख्याध्यापक किसन चव्हाण यांच्या शुभहस्ते विशेष सत्कार करण्यात आला व त्यांना भावी शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलतांना प्रा. किसन चव्हाण म्हणाले की, अत्यंत ग्रामीण भागातील की जो परिसर ऊसतोड कामगाराच्या नावाने ओळखला जातो त्याला परिसरात शाळेव्यतिरिक्त कोणतेही जादा तासिकाची व्यवस्था नसतानाही आणी कुटुंबाला मदत करत अभ्यास करून इतका निकाल आणी मुलांची गुणवत्ता ही कौतुकास्पद असून ग्रामीण भागातील मुलांमध्ये प्रचंड गुणवत्ता आहे फक्त त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण आणी मार्गदर्शनाची आवशकता आहे. यावेळी विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक बोरुडे अरुण, महादेव मगरे, संजय डमाळ, बाळासाहेब सुसे, गणेश वाणी, श्रीधर डोळस,ज्ञानेश्वर भिटे,गणेश भालसिंग, बाजीराव आल्हाट, शिवनाथ आव्हाड, पांडुरंग बडे, हरिभाऊ बडे शिक्षक, पालक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कुठलाही क्लास न लावता अनुष्का मुठे हिचे सुयश

## तालुक्यात प्रथम येण्याचा पटकावला मान

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

कष्ट करण्याची तयारी आणि मनाचा निश्चय असेल तर यश आपोआप आपले मागे येते याचा प्रत्यय शहरातील डीडी काचोळे विद्यालयातील इयत्ता दहावीची विद्यार्थीनी अनुष्का नानासाहेब मुठे हिने करून दिला. दहावीच्या परीक्षेत सेमी इंग्रजी मध्ये कोणतेही क्लास न लावता तिने ९७.८०% गुण मिळवून डी डी काचोळे विद्यालयात तसेच तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला.तिच्या या यशाचे तालुक्यात मोठे कौतुक होत आहे.तिच्या यशाने भारून जाऊन तिचे वडील नानासाहेब मुठे यांनी तिला एक पत्र लिहिले आहे. ते पत्र असे: कुमारी अनुष्का,बाळा,तुझे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. कारण ही तसेच आहे,तू .. बोर्ड परीक्षेत ९७.८०% गुण मिळवून विद्यालयात आणि मराठी - सेमी माध्यमात तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे. खरे तर हे तुझे यश अजून यासाठी खास आहे की,तू कोणत्याही प्रकारच्या खाजगी शिकवणी शिवाय हे यश संपादन केले आहेस. खरंच तू हे सिद्ध केले आहेस की,तुमची अभ्यास करण्याची प्रामाणिक इच्छा असेल तर तुम्हाला कोणत्याही खाजगी क्लासेसची आवश्यकता नाही.आणि तू हेही सिद्ध केले आहे की आपणास शिकविणारे शिक्षक हे कुठेच कमी पडत नाहीत ते आपल्या परीने १००% देत असतात.गरज असते ती आपण १००% घेण्याची.या यशाच्या पाठीमागे तुझे अथांग परिश्रम आहेत, कारण तू गेली दोन वर्षे ना आजी आजोबा ना मामाचे गाव ना काका मावशी कुठेच गेली नाहीस,एन्जॉय नावाची गोष्ट तू डिलिट केली होतीस,म्हणूनच तर तुझा रिझल्ट आज सगळे जण



एन्जॉय करत आहेत.तुझ्या या यशात तुझे परिश्रम तर आहेतच पण त्याच बरोबर तुला शिकविणारे इयत्ता पहिली ते दहावी पर्यंतच्या सर्वच गुरू जणांचा मोलाचा वाटा आहे.तुला या यशापर्यंत घेऊन जाण्यासाठी मार्गदर्शकाची गरज असते आणि ती भूमिका अनेकांनी पार पाडली. त्यांमध्ये खैरे सर यांनी तुला सेमी विभागात प्रविष्ट करण्याचा आग्रह केला.विद्यालयाचे मुख्याध्यापक मान.साळवे साहेब यांनी तो निर्णय लगेच अमलात आणला. जेणेकरून तुला एक स्पर्धेचे वातावरण मिळाले,आणि तू त्यातून तावून सुलाखून निघालीस. श्री.रासकर सर,श्री.शिंदे सर यांनी सदैव इंग्रजी विषयाचे मार्गदर्शन केले,श्री.कदम सर यांनी क्रीडा विभागात तुला राज्यस्तरापर्यंत घेऊन गेले. तुझ्या यशात खऱ्या अर्थाने जिने स्वतःला झोकून दिले. ती म्हणजे तुझी आई जिने दोन वर्षात ना माहेर ना सासर ना नातेवाईक ना कुठला एन्जॉय केला. ती खऱ्या अर्थाने सावली प्रमाणे तुझ्या बरोबर उभी राहिली,तिने अनेक इच्छा ना मुरड घातली.आणि सर्वात महत्वाचे म्हणजे ज्यांचा उल्लेख झाल्याशिवाय हे यश पुराण पूर्ण होणार नाही ते म्हणजे तुझ्या जीवनात भगवान श्रीकृष्णाप्रमाणे तुझे सारथी झालेले तुझे आवडते काका आमचे छोटे बंधू, श्री. सोपान नन्नावरे सर जणुकाही तू मुक्ता आणि काका सोपान दोघांनी मिळून हे यश संपादन केले आहे. खरे तर तुमचे दोघांचे ध्येय खूप मोठे आहे आणि त्यानुसार तुमची वाटचाल सुरू आहे. असं म्हटले जाते की यशाचा मार्ग हा खडतर असतो पण जर या मार्गावर आशीर्वाद रुपी मार्गदर्शन करणारी अनेक माणसे मार्ग सोपा करतात. विशेषतः त्यामध्ये आवर्जून उल्लेख व्हावा अशा रयतच्या मॅनेजिंग कॉन्सिल सदस्या मीनाताई जगधने यांचे मोलाचे मार्गदर्शन प्रोत्साहन लाभले. तुला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मार्गदर्शन करणाऱ्या सर्वच घटकांचे मनः पूर्वक आभार. अनुष्काची कष्ट करण्याची तयारी व तिला कुटुंबातून मिळालेली साथ त्यामुळे तिने हे उत्तम यश संपादन केले आहे.प्रत्येक कुटुंबात जर असे विद्यार्थी आणि पालक असतील तर निश्चितपणे उद्याची भावी पिढी मोठी मजल मारील यात शंका नाही.

# जागतिक मधमाशी दिन

आज २० मे, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक मधमाशी दिन म्हणून साजरा केला जातो. अँतोन जोंसा या जगप्रसिद्ध मधुमक्षिका पालन तज्ज्ञाचा २० मे १७३४ रोजी स्लोव्हेनिया या देशातील गरीब कुटुंबात जन्म झाला. त्यांनी १७६६ मध्ये युरोपात पहीले मधमाशी पालन केंद्र सुरू केले. १७७१ मध्ये त्यांनी मधुमाशीपालनावरील पहिले पुस्तक प्रकाशित केले होते. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन संयुक्त राष्ट्रसंघाने २० मे २०१८ पासून २० मे हा दिवस जागतिक मधमाशी दिन म्हणून घोषित केला. या दिवशी मधमाशांचे संवर्धन करण्यासह कीटकांचे संवर्धन करण्यासाठी जनजागृती केली जाते. मधमाशी हा पर्यावरणातील अतिशय महत्वाचा घटक आहे. मधमाशी हे जीवसृष्टीला मिळालेले सर्वोत्तम वरदान आहे. मधमाशीला सामाजिक कीटक असे म्हटले जाते. मधमाशा इतर किटकांप्रमाणे एकट्या दुकट्या राहत नाही तर त्या समूह करून राहतात. त्यांच्या घराला पोळे असे म्हणतात. एका पोळ्यात हजारो मधमाशा असतात. मधमाशा त्यांच्या अन्नाच्या पूर्ततेसाठी फुलातील मकरंद आणि पराग गोळा करतात. मधमाशा एका फुलावरून दुसऱ्या फुलावर परागकणांचे स्थलांतर करतात त्यामुळे फुलांची बीजधारणा व फलधारणा होते त्यालाच परागीभवन असे म्हणतात. परागीभवनामुळे पीक उत्पादनात २५ ते ३० टक्के वाढ होते हे शास्त्रज्ञांनी सिद्ध करून दाखवले आहे त्यामुळे मधमाशा या शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहेत. तरीही मधमाशीपालनाबाबत आपल्याकडील शेतकरी अजूनही गंभीर नाहीत उलट मधमाशांचे पोळे जाळून त्यांना शेतातून हाकलून देण्याकडेच शेतकऱ्यांचा कल असतो. पूर्वी शेतात, बांधावर, आजूबाजूला सहज नजरेस पडणारी मधमाशांची पोळे आता दिसत नाही. मधासाठी पोळे जाळणे, कीटकनाशके फवारणे, मोबाईल टॉवर उभारणे, मधमाशांविषयी अज्ञान पसरवणे या कारणांमुळे मधमाशी सारखा उपयुक्त जीव नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. परिसरातील मधमाशा नष्ट झाल्या तर त्याचा पीक उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो म्हणून आपण सर्वांनी मधमाशांच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी पुढे आले पाहिजे. मधमाशांची शास्त्रिय माहिती घेऊन तिचे संगोपन करण्याचे तंत्र अवगत केले पाहिजे. पराग सिंचनामुळे शेती उत्पादनात वाढ होत असल्याने मध व मेन या बाबीपेक्षा उत्पादनातील वाढ हा महत्वाचा घटक मानून शेतकऱ्यांनी मधमाशी पालनाला अग्रक्रम द्यायला हवा. सरकारनेही याबाबत शेतकऱ्यांचे प्रबोधन करायला हवे. रोजगार निर्मितीला वाव असल्याने मधमाशी पालन हा पूरक उद्योग म्हणून केल्यास ग्रामीण भागातील बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो. मधमाशी ही आपल्यासाठी अतिशय महत्वाचे काम करते. मधमाशांकडून शिकण्यासारखेही खूप आहे. समूहात राहून आदर्श जीवन कसे जगावे हे मधमाशांकडून शिकावे. दीर्घ कष्ट केल्याने मधासारखा गोड पदार्थ निर्माण करता येतो हे मधमाशांनी दाखवून दिले आहे. मधमाशी हा केवळ मानवासाठीच नव्हे तर संपूर्ण जीवसृष्टीसाठी अतिशय महत्वाचा घटक आहे. आपण सर्वांनी मधमाशी वाचवण्याचा पर्यायाने जीवसृष्टी वाचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला तरच मधमाशी दिनाचे सार्थक झाले असे म्हणावे लागेल.





**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
समाजसंवाद

# ८ जून रोजी २ रे एकदिवसीय रंगधनु नवरंग साहित्य संमेलन

## नवी मुंबईत रंगणार साहित्यिकांचा मेळा

**नवी मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**


साहित्य, कला आणि संस्कृतीच्या त्रिवेणी संगमातून सजणार आहे नवी मुंबई. नवरंग साहित्य संस्कृती आणि कला मंडळ यांच्या वतीने आयोजित '२रे एकदिवसीय रंगधनु नवरंग साहित्य संमेलन २०२५' हा बहुप्रतिक्षित साहित्यिक सोहळा रविवारी ता. ८ जून २०२५ रोजी सकाळी १० वाजता, कोपरखैरणे येथील 'ज्ञानविकास शिक्षण संकुल सभागृहात' रंगणार आहे. संमेलनाच्या अध्यक्षपदाची धुरा ज्येष्ठ साहित्यिक एल.बी. पाटील यांच्याकडे असून, स्वागताध्यक्ष म्हणून ज्येष्ठ सामाजिक नेते पी. सी. पाटील उपस्थित राहणार आहेत. संमेलनाचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य समारंभाने होणार आहे. पहिल्या सत्रात, नवरंगचे अध्यक्ष गज आनन म्हात्रे लिखित 'नवी मुंबईच्या प्राचीन ग्रामदेवता' या संशोधनात्मक पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे. या ग्रंथाचे ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित करणारे हा रंगीन सोहळा ठरणार आहे. यानंतर, नवी मुंबईतील सहा गुणी कलाकारांना 'नवरंग कलारत्न पुरस्कार २०२५' प्रदान करण्यात येणार आहे. साहित्य, कला, लोकसंस्कृती आणि समाजकार्य क्षेत्रातील मान्यवरांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली असून, त्यांची नावे संमेलनस्थळी जाहीर केली जातील. दुसऱ्या सत्रात, 'आजचे पुस्तक दिशा आणि दशा' या विषयावर सखोल परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. या परिसंवादाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक देविदास पोटे हे असतील. या चर्चासत्रात नामवंत लेखक, समीक्षक आणि वाचक सहभागी होणार आहेत. तिसऱ्या आणि अंतिम सत्रात, प्रसिद्ध साहित्यिका प्रतिभा सराफ यांच्या अध्यक्षतेखाली खुल्या कवीसंमेलनाचे आयोजन होणार आहे. विविध काव्यप्रकारांचा आस्वाद घ्यायची ही एक पर्वणी ठरणार आहे. नवी मुंबईसह ठाणे, मुंबई, पुणे येथील अनेक नवोदित आणि ज्येष्ठ कवी यात सहभागी होणार आहेत. संमेलनाचे संयोजक गज आनन म्हात्रे यांनी संपूर्ण कार्यक्रमाची माहिती दिली असून, अधिक माहितीसाठी ९३२३१७२६१४ ह्या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. साहित्यप्रेमींनी या बहारदार सांस्कृतिक सोहळ्यास उपस्थित राहून साहित्यिक आनंदाची अनुभूती घ्यावी, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# जिरायती गावांचा समावेश नेप्ती महसूल मंडळात करा; शेतकऱ्यांचे फेरनिवेदन

**नगर तालुका । दिपक शिरसाठ**

निंबळक, इसळक आणि खारे कर्जुने ही जिरायती गावे नागापुर महसूल मंडळाऐवजी नव्याने स्थापन झालेल्या नेप्ती महसूल मंडळात समाविष्ट करावीत, या मागणीसाठी शेतकऱ्यांनी पुन्हा एकदा प्रशासनाकडे फेरनिवेदन दिले आहे. हे निवेदन महसूल शाखेचे नायब तहसीलदार अभिजित वांढेकर यांना पंचायत समितीचे माजी सभापती रामदास भोर व माजी उपसभापती डॉ. दिलीप पवार, बी. डी. कोतकर यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले. या गावांचा भौगोलिक आणि हवामानाशी संबंधित दृष्टिकोन लक्षात घेता, त्यांचा समावेश नेप्ती महसूल मंडळात करणे गरजेचे असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. नागापुर मंडळात असलेल्या बागायती गावांच्या तुलनेत या जिरायती गावांना योग्य पर्जन्यमापक सुविधा नाही. नागापुर महसूल मंडळात असणारे विळद, देहरे, नांदगाव शिंगवे, शिंगवे नाईक ही बागायती गावे आहेत. तर निंबळक, इसळक आणि खारे कर्जुने ही जिरायती गावे असून खारे कर्जुने गावात भारत सरकारच्या संरक्षण खात्याचे मोठ्या प्रमाणात पड व नापिक क्षेत्र आहे.

त्यामुळे पीक विमा, नैसर्गिक आपत्तीतील मदत, व शेती कर्ज पुनर्गठन यांसारख्या महत्त्वाच्या योजनांपासून शेतकरी वंचित राहतात. या मागणीसाठी गेल्या वर्षभरात वारंवार निवेदने दिली गेली असूनही अद्याप सकारात्मक निर्णय झालेला नाही. आता तरी प्रशासनाकडून या प्रश्नावर ठोस कार्यवाही व्हावी, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.





# आटकळे यांना सेतुबंध साहित्य पुरस्कार

**पंढरपूर । प्रतिनिधी**

येथील साहित्यिक गणेश आटकळे यांना ता.१८ मे रोजी तपोवन बहुउद्देशीय सामाजिक संस्था संचालित विठाई वारकरी गुरुकुल यांच्या वतीने सेतुबंध साहित्य पुरस्कार प्रदान करण्यात आला. सॉफ्टवेअर इंजिनिअर असलेले गणेश आटकळे यांनी दर्जेदार साहित्य निर्मिती केली. शोधक आणि जीवापाड हि त्यांची दोन पुस्तके लोकप्रिय ठरत आहेत. यावेळी माढा मतदारसंघाचे आ. अभिजित पाटील, ह.भ.प. भागवत महाराज चवरे, ह.भ.प. सूर्याजी महाराज भोसले यांच्याकडून आटकळे यांना सन्मानित करण्यात आले. त्याचबरोबर यावेळी अभिजित पाटील यांच्या मातोश्री जयश्री पाटील यांना संस्थेच्या वतीने आदर्श मातृगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पत्रकारिता, कृषी, साहित्य, कला, क्रीडा, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या इतर मान्यवरांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आले.

# एसटी महामंडळ ऑनलाईन बदल्यांमध्ये अधिक सुसूत्रता

**मुंबई । प्रतिनिधी**

परिवहन विभागातील ऑनलाईन बदल्यांमुळे पारदर्शकतेबरोबरच जास्तीत जास्त अधिकारी – कर्मचाऱ्यांना मागणी केलेला पसंतीक्रम मिळत असल्याने बहुतेक अधिकाऱ्यांचे समाधान होते. त्यामुळे भविष्यात परिवहन विभागातील ऑनलाईन बदल्यांमध्ये अधिक सुसूत्रता आणावी, तसेच महिला अधिकारी वर्गाच्या अडचणी प्राधान्याने विचारात घ्याव्यात, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या उपस्थितीत मंत्रालयातील दालनात परिवहन विभागातील १५९ मोटार वाहन निरीक्षकांच्या ऑनलाईन बदल्या करण्यात आल्या. बैठकीस परिवहन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, सहसचिव राजेंद्र होळकर आदी उपस्थित होते.



# विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी पुस्तकांचे पाठबळ

## शिक्षक संभाजी सोनवणे यांचा स्तुत्य उपक्रम

**नगर तालुका । दीपक शिरसाठ**

निंबळक (ता. नगर) येथील शिक्षक संभाजी मारुती सोनवणे यांनी सामाजिक बांधिलकीचे भान जपत स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी ११ हजार रुपयांची पुस्तके विद्यार्थ्यांना भेट दिली. त्यांच्या या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील होतकरू व मेहनती विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी नवे दालन खुले झाले आहे. स्पर्धा परीक्षेचा स्वप्नवत मार्ग आता सुकर "आमच्या काळात अभ्यासासाठी ना पुरेशा सुविधा, ना साधने. अनेकदा आर्थिक अडचणींमुळे स्पर्धा परीक्षा हे फक्त स्वप्नच राहायचं. आज कोणाचंही स्वप्न केवळ पुस्तकांच्या अभावामुळे थांबू नये, म्हणून ही मदत करत आहे," असे संभाजी सोनवणे यांनी यावेळी सांगितले. त्यांची ही मदत केवळ आर्थिक आधार नसून प्रेरणादायी सुद्धा आहे. पुस्तकांचा संच म्हणजे विद्यार्थ्यांसाठी यशाचा पाया घालणारा एक महत्त्वाचा टप्पा ठरतोय. एस.के. लायब्ररीकडून विशेष आभार या उपक्रमासाठी एस.के. लायब्ररीकडून शिक्षक सोनवणे यांचे विशेष आभार मानण्यात आले. यावेळी लायब्ररीचे भास्कर कोतकर, पी.एस.आय. आदेश वामन, ज्ञानेश्वर खामकर, अतुल दिवटे, सोमनाथ गाडेकर, अक्षय मगर, विकास हिवाळे यांच्यासह अनेक विद्यार्थी उपस्थित होते. गावकऱ्यांचा उदंड प्रतिसाद या स्तुत्य कार्याचे गावातील शिक्षक, विद्यार्थी आणि पालक मंडळींनी खुलेपणाने कौतुक केले आहे. "असे उपक्रम इतर शिक्षकांनाही प्रेरणा देतील," असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# निर्मलनगर परीसरात मध्यरात्री घरांवर दगडफेक; पोलिसांनी कारवाई करावी

**अहमदनगर । विजय मते**

येथील सावेडी उपनगरात निर्मलनगर परिसरातील पत्राचाळ, रो-होंसिंग, गाडेकर चौक परिसरात गेल्या काही दिवसांपासून मध्यरात्री अज्ञात समाजकंठका कडून घरांवर दगडफेक केली जात आहे. या प्रकारामुळे परिसरातील रहिवाशांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. या संदर्भात रहिवाशांनी तोफखाना पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली. या तक्रारीनुसार मागील १५ ते २० दिवसांपासून मध्यरात्रीच्या सुमारास काही अज्ञात व्यक्ती घरांवर मोठे दगड फेकत आहेत. त्यामुळे घरावरील सिमेंटचे पत्रे फाटले असून, काचाही फुटल्या आहेत. एखाद्या पत्र्याच्या आड कोणी झोपले असेल, तर डोक्याला गंभीर इजा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यासंदर्भात पोलिस निरिक्षक यांना निवेदन देण्यात आले. यावेळी नगरसेवक निखिल वारे, राहुल गोणे, आरती परदेशी, अंबिका गंगीशेट्टी, उषा औटी, कृष्णा शिंदे, वैभव साळवे, अरुणा कांबळे, कमल आडेप आणि राऊत आदी उपस्थित होते. नगरसेवक निखिल वारे यांनी यावेळी बोलताना सांगितले, या प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण पसरलं असून पोलिसांनी तत्काळ कारवाई करावी. अशा घटनांनी सामाजिक शांततेला बाधा पोहोचत आहे. संबंधित अज्ञात समाजकंठकांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी आम्ही प्रशासनाकडे केली असल्याचे श्री.वारे यांनी सांगितले. पोलिस प्रशासनाकडे या प्रकाराची गांभीर्याने दखल घेऊन परिसरात गस्त वाढवावी व दहशत निर्माण करणाऱ्या अज्ञात समाजकंठकां वर कारवाई करावी अशी मागणी येथील रहिवाशी यांनी केली आहे.

